
Epaper
डिजिटल क्रांतीची धगधगती मशाल
MSME - MH-33 -0714843
दैनिक
सत्याचे प्राईम्स
# जन सम्राट टाईम्स
मुख्य संपादक: मुकुंदराव शामराव नंन्नवरे
। शनिवार, दि. २३ मे २०२६ । वर्ष १ । अंक ४८ । पाने २ ।
DIGITAL EDITION

राज्यातही मतदारयाद्यां मध्ये घोळ करण्याचा प्रयत्न?

(पान २ वर)



» Selected

## पेट्रोल-डिझेल पुन्हा महागले!

मुंबई । सर्वसामान्यांच्या खिशाला पुन्हा एकदा कात्री लागली आहे. आंतरराष्ट्रीय बाजारातील कच्च्या तेलाच्या वाढत्या किमती आणि पश्चिम आशियातील वाढत्या तणावाचा थेट फटका भारतीय ग्राहकांना बसला आहे. शनिवारी देशभरात पेट्रोल आणि डिझेलच्या दरात पुन्हा एकदा वाढ करण्यात आली. आज पेट्रोल ८७ पैशांनी तर डिझेल ९१ पैशांनी महागले आहे. विशेष म्हणजे, गेल्या अवघ्या १० दिवसांतील ही तिसरी मोठी दरवाढ आहे. या दरवाढीमुळे वाहतूक खर्च वाढण्याची शक्यता असून, पर्यायाने सर्वसामान्य नागरिकांना महागाईच्या आणखी एका धक्क्याला सामोरे जावे लागण्याची चिन्हे आहेत.याआधी १६ मे रोजी तेल कंपन्यांनी पेट्रोल आणि डिझेलच्या दरात थेट ३ रुपयांची मोठी वाढ केली होती. त्यानंतर १९ मे रोजी सर्व प्रमुख महानगरांमध्ये पुन्हा ९० पैशांची दरवाढ झाली.

महाराष्ट्र शासनाची 'आंतरजातीय विवाह प्रोत्साहन योजना'

# जातीची भिंत ओलांडणाऱ्या जोडप्यांना सरकारची साथ!

## पात्र जोडप्यांना मिळणार ५० हजारांचे आर्थिक सहाय्य

जन सम्राट टाईम्स

**मुंबई । समाजातील जातीय भेद कमी करून सामाजिक सलोखा आणि ऐक्य वाढावे, या उद्देशाने महाराष्ट्र शासनाच्या समाज कल्याण विभागामार्फत 'आंतरजातीय विवाहास प्रोत्साहन योजना' राबविण्यात येत आहे. या योजनेअंतर्गत आंतरजातीय विवाह करणाऱ्या पात्र विवाहित जोडप्यांना संसार उभारणीसाठी शासनाकडून तब्बल ५० हजार रुपयांचे आर्थिक सहाय्य दिले जाते.**



राज्यात सामाजिक परिवर्तन घडवून आणण्यासाठी ही योजना महत्त्वाची मानली जात असून, अनेक तरुण-तरुणींना याचा लाभ मिळत आहे. या योजनेचा लाभ घेण्यासाठी विवाहित जोडपे महाराष्ट्रातील रहिवासी असणे आवश्यक आहे. तसेच पती किंवा पत्नी यांपैकी एक व्यक्ती अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती किंवा विशेष मागास प्रवर्गातील असणे बंधनकारक आहे. संबंधित व्यक्तीचा अधिकृत जातीचा दाखला अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे. शासनाच्या निकषांनुसार मागास प्रवर्गातील व्यक्तीचा विवाह सवर्ण हिंदू, लिंगायत, जैन किंवा शीख समाजातील व्यक्तीसोबत झाल्यास त्या विवाहाला आंतरजातीय विवाह म्हणून मान्यता दिली जाते. तसेच अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती आणि भटक्या जमातीतील वेगवेगळ्या प्रवर्गांतील विवाहांनाही या योजनेत समाविष्ट करण्यात आले आहे.

### वय आणि विवाह नोंदणी अनिवार्य

योजनेचा लाभ घेण्यासाठी विवाहाच्या वेळी वराचे वय किमान २१ वर्षे आणि वधूचे वय १८ वर्षे पूर्ण असणे आवश्यक आहे. यासाठी दोघांचे शाळा सोडल्याचे दाखले सादर करावे लागतात. तसेच विवाह अधिकृतरीत्या नोंदणीकृत असणे बंधनकारक असून विवाह नोंदणी प्रमाणपत्र अर्जासोबत जोडावे लागते.

### ही कागदपत्रे आवश्यक

अर्ज करताना विवाहित जोडप्याचा संयुक्त फोटो, आधार कार्ड, शाळा सोडल्याचे दाखले, जातीचा दाखला आणि दोन प्रतिष्ठित व्यक्तींची शिफारस पत्रे आवश्यक असतात. सर्व कागदपत्रांच्या स्वप्रमाणित प्रती जोडणे बंधनकारक आहे.

### ५० हजारांची मदत कशी मिळते?

योजनेअंतर्गत मंजूर होणारी ५० हजार रुपयांची आर्थिक मदत पती-पत्नीच्या संयुक्त नावाने दिली जाते. ही रक्कम धनादेशाद्वारे किंवा संयुक्त बँक खात्यात जमा करण्यात येते. शासनाकडून मिळणारी ही मदत नवदांपत्यांना संसार उभारण्यासाठी मोठा आधार ठरत आहे.

### अर्ज कुठे आणि कसा करायचा?

या योजनेसाठी अर्ज प्रक्रिया सध्या ऑफलाइन पद्धतीनेच करण्यात येते. संबंधित जिल्हा परिषद कार्यालयातील जिल्हा समाज कल्याण अधिकारी यांच्या कार्यालयातून विहित नमुन्यातील अर्ज घ्यावा लागतो. अर्ज पूर्ण भरून आवश्यक कागदपत्रांसह तो प्रत्यक्ष कार्यालयात जमा करावा लागतो. अर्जाची पडताळणी झाल्यानंतर पात्र लाभार्थ्यांना आर्थिक सहाय्य मंजूर केले जाते.

### सामाजिक परिवर्तनासाठी महत्त्वाची योजना

समाजातील भेदभाव कमी करून समतेची भावना बळकट करण्यासाठी या उपक्रमाकडे सकारात्मक पाऊल म्हणून पाहिले जात आहे.या योजनेचा लाभ घेण्यासाठी विवाहित जोडपे महाराष्ट्रातील रहिवासी असणे आवश्यक आहे. तसेच पती किंवा पत्नी यांपैकी एक व्यक्ती अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती किंवा विशेष मागास प्रवर्गातील असणे बंधनकारक आहे. संबंधित व्यक्तीचा अधिकृत जातीचा दाखला अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे. शासनाच्या निकषांनुसार मागास प्रवर्गातील व्यक्तीचा विवाह सवर्ण हिंदू, लिंगायत, जैन किंवा शीख समाजातील व्यक्तीसोबत झाल्यास त्या विवाहाला आंतरजातीय विवाह म्हणून मान्यता दिली जाते.

जन सम्राट टाईम्स | ब्रेक न्यूज | ज

# भक्ती आणि माणुसकीचा प्रत्यय!

## वानराच्या मृत्यूनंतर ग्रामस्थांकडून अंत्यसंस्कार

जन सम्राट टाईम्स



**भवरखेडे || प्रतिनिधी:** धरणगाव तालुक्यातील विवरे गावात माणुसकी, श्रद्धा आणि प्राणिमात्रांविषयीची आत्मीयता याचे हृदयस्पर्शी उदाहरण पाहायला मिळाले. गावातील एका वानराचा अकस्मित मृत्यू झाल्यानंतर ग्रामस्थांनी त्याच्यावर विधिवत अंत्यसंस्कार करत भावपूर्ण निरोप दिला. या घटनेची परिसरात सर्वत्र चर्चा होत असून ग्रामस्थांच्या संवेदनशीलतेचे कौतुक केले जात आहे. शेतात मृतावस्थेत आढळला वानर शुक्रवारी सकाळी सात वाजेच्या सुमारास विवरे येथील शेतशिवारात एका वानराचा मृत्यू झाल्याची माहिती ग्रामस्थांना मिळाली. ही बातमी समजताच गावकऱ्यांनी घटनास्थळी मोठी गर्दी केली. संबंधित वानर हे गावातील महादेव मंदिर परिसरात नेहमी वावरत असे. ग्रामस्थही त्याला प्रेमाने खाऊ घालत असल्याने गावाशी त्याचे एक वेगळे नाते निर्माण झाले होते.बजरंगबलीच्या रूपात मानून श्रद्धांजली हिंदू धर्मात वानराला भगवान बजरंगबलीचे रूप मानले जाते. याच श्रद्धेतून ग्रामस्थांनी वानराचा अंत्यविधी शास्त्रोक्त पद्धतीने करण्याचा निर्णय घेतला. वानराच्या पार्थिवाला पुष्पहार अर्पण करण्यात आले तसेच भक्तीमय वातावरणात अंत्ययात्रा काढण्यात आली. अनेकांचे डोळे पाणावले अंत्यसंस्कारावेळी अनेक ग्रामस्थ भावूक झाले होते. गावातील महिला, युवक आणि ज्येष्ठ नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून श्रद्धांजली अर्पण केली.

### तेराव्याचाही विधी होणार

विशेष म्हणजे, ग्रामस्थांनी या वानराचा तेरावा विधीही सामूहिकपणे करण्याचा निर्णय घेतला आहे. या अनोख्या घटनेमुळे विवरे गावाने भक्ती, करुणा आणि माणुसकीचा एक वेगळाच आदर्श समाजासमोर ठेवला आहे.या प्रसंगी गावात काही काळ अत्यंत भावनिक वातावरण निर्माण झाले होते.

# डांबून ठेवलेल्या १२ ऊसतोड मजुरांची सुटका! जळगाव-धुळेतील मजूर सुखरूप घरी परतले

जन सम्राट टाईम्स

**जळगाव-धुळे | प्रतिनिधी:** ऊसतोडीच्या कामाचे आमिष दाखवून पुणे जिल्ह्यात नेण्यात आलेल्या जळगाव जिल्ह्यातील पारोळा आणि धुळे जिल्ह्यातील दोदवाड येथील १२ मजुरांना डांबून ठेवून जबरदस्तीने काम करून घेतल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. मजुरी न देता उपासमारीची वेळ आलेल्या या मजुरांची अखेर जन साहस फाउंडेशनच्या पुढाकाराने आणि धुळे-पुणे प्रशासनाच्या सहकार्याने सुटका करण्यात आली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, ढोली (ता. पारोळा) तसेच धुळे जिल्ह्यातील दोदवाड गावातील १२ मजुरांना ऊसतोडीच्या कामासाठी पुणे जिल्ह्यातील दौंड तालुक्यात नेण्यात आले होते. मात्र तेथे त्यांना ऊसतोडीसह इतर गुऱ्हाळ कामांसाठी जबरदस्तीने कामाला लावण्यात आले. मजुरीची रक्कम मागितल्यावर संबंधित मजुरांना धमकावण्यात येत होते. तसेच त्यांच्यावर सतत



नजर ठेवून इच्छेविरुद्ध काम करून घेतले जात असल्याचा आरोप करण्यात आला आहे. हेल्पलाईनवरून उघड झाला प्रकार या मजुरांपैकी रामकृष्ण अनिल मोरे आणि रविंद्र झुलाल भिल यांनी जन साहस संस्थेच्या कामगार हेल्पलाईन क्रमांकावर संपर्क साधून आपल्यावर होत असलेल्या अन्यायाची माहिती दिली. त्यानंतर जन साहस संस्थेने तातडीने प्रशासनाशी संपर्क साधत प्रकरणाची गंभीर दखल घेण्याची मागणी केली.

धुळे आणि पुणे प्रशासनाची तात्काळ कारवाई जन साहस संस्थेने जिल्हाधिकारी आणि आरडीसी अधिकाऱ्यांना माहिती दिल्यानंतर तात्काळ कारवाईचे आदेश देण्यात आले. पुणे जिल्हाधिकाऱ्यांच्या सहकार्याने महसूल विभाग आणि कामगार विभागाला पुढील रेस्क्यू मोहिमेसाठी निर्देश देण्यात आले. रेस्क्यू पथकाने केली सुटका जन साहस संस्थेचे प्रतिनिधी विरसेन काजळे, रुबीना सय्यद, बाळासाहेब शिंदे (जळगाव), सोनम बिऱ्हाडे, कपिल बोरसे आणि सागर कालशेट्टी यांच्या पथकाने दौंड तालुक्याचे प्रांत अधिकारी आणि तहसीलदार यांच्या मदतीने बचाव मोहीम राबवली. बंधपत्रित कामगार कायद्यानुसार कारवाई करत संबंधित मजुरांची सुटका करण्यात आली आणि त्यांना सुखरूपपणे त्यांच्या गावी पोहोचविण्यात आले.

# मयत व्यक्तींच्या नावाने कथित खोटी संमतीपत्रे

## पिता-पुत्र व जावयांचा संस्थेवर ताबा मिळवण्याचा डाव फसला?

जन सम्राट टाईम्स

**धरणगाव | प्रतिनिधी :** धरणगाव येथील प्रतिष्ठित शैक्षणिक संस्था धरणगाव उर्दू एज्युकेशन सोसायटी संचलित अँग्लो उर्दू हायस्कूल अँड ज्युनिअर कॉलेज संदर्भात गंभीर स्वरूपाचे आरोप समोर आले आहेत. बनावट कागदपत्रे, कथित खोट्या सह्या, मयत व्यक्तींच्या नावांचा वापर आणि बोगस सभांच्या माध्यमातून संस्थेवर ताबा मिळवण्याचा प्रयत्न झाल्याचा दावा संस्थेचे कार्यकारी संचालक सगीर अहमद गुलाम रसूल यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे केला आहे. या प्रकरणामुळे धरणगावच्या शैक्षणिक आणि सामाजिक क्षेत्रात मोठी खळबळ उडाली असून, संस्थेच्या कारभारावर अनेक प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहेत. शैक्षणिक संस्थेच्या नावावर सुरू झालेला हा वाद आता न्यायालयीन आणि प्रशासकीय पातळीवर पोहोचण्याची चिन्हे दिसत आहेत. मयत व्यक्तींच्या नावांचा कथित वापर प्रसिद्धीपत्रकानुसार, अकील अहमद अब्दुल रज्जाक काझी यांनी काही सहकाऱ्यांच्या मदतीने संस्थेवर नियंत्रण मिळवण्यासाठी प्रयत्न केल्याचा आरोप करण्यात आला आहे. यासाठी मयत अब्दुल रहीम शेख इब्राहीम बेलदार आणि रफीयोद्दिन शेख महेबूब यांच्या नावाने कथितरीत्या खोटी संमतीपत्रे तयार करण्यात आल्याचा गंभीर





दावा करण्यात आला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, संबंधित व्यक्तींचा मृत्यू अनुक्रमे ८ फेब्रुवारी २०१४ आणि ६ जून २०१४ रोजी झाला होता.

मात्र त्यानंतर झालेल्या प्रक्रियेत त्यांच्या नावांचा वापर करून त्यांची कार्यकारिणीत निवड दाखवण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे.

त्यामुळे मृत व्यक्तींच्या नावाने संमती कशी मिळाली, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. बोगस सभा आणि खोट्या सह्यांचा आरोप दि. २० ऑगस्ट २०१४ रोजी सभेचा अजेंडा तयार करताना काही सर्वसाधारण सदस्य आणि कार्यकारी संचालकांच्या कथित बनावट सह्या घेण्यात आल्याचा आरोपही प्रसिद्धीपत्रकात करण्यात आला आहे. त्यानंतर दि. २४ ऑगस्ट २०१४ रोजी झालेल्या कथित सर्वसाधारण सभेच्या आधारे तयार करण्यात आलेल्या कागदपत्रांच्या आधारे दि. ४ एप्रिल २०१५ रोजी धर्मदाय उपायुक्त कार्यालय, जळगाव येथे फेरफार क्रमांक ४९१/२०१५ मंजुरीसाठी प्रस्ताव दाखल करण्यात आल्याचा दावा करण्यात आला आहे.

# रीवा येथे भरधाव कारची पायी जाणाऱ्या आर्यिका संघाला धडक!

## जैन समाजात शोककळा

जन सम्राट टाईम्स



**रीवा (मध्य प्रदेश) | प्रतिनिधी :** मध्य प्रदेशातील रीवा येथे घडलेल्या भीषण अपघातात जैन धर्मातील दोन पूज्य साध्वींचे दुर्दैवी समाधीमरण झाले आहे. परम पूज्य आर्यिका श्री सौम्यमति माताजी यांच्या संघातील पूज्य आर्यिका श्री श्रुतमति माताजी आणि पूज्य आर्यिका श्री उपशममति माताजी यांना भरधाव कारने जोरदार धडक दिल्याने हा दुर्दैवी प्रकार घडला. या घटनेमुळे संपूर्ण जैन समाजात हळहळ व्यक्त होत आहे. सकाळच्या वेळी घडली दुर्घटना ही हृदयद्रावक घटना २० मे २०२६ रोजी सकाळी साडेसहा वाजण्याच्या सुमारास घडली. आर्यिका संघ सकाळचे धार्मिक विधी पूर्ण करून परतत असताना मागून आलेल्या भरधाव ऑल्टो कारने त्यांना जोरदार धडक दिली. या वेळी आर्यिका श्री सौम्यमति माताजी यांच्यासोबत चालणाऱ्या एका श्रावकाने प्रसंगावधान दाखवत त्यांना बाजूला खेचले. त्यामुळे त्या थोडक्यात बचावल्या; मात्र या प्रयत्नात संबंधित सेवकाचा पाय फ्रॅक्चर झाला असून तो गंभीर जखमी झाला आहे. श्रुतमति माताजींचा जागीच मृत्यू अपघात इतका भीषण होता की पूज्य आर्यिका श्री श्रुतमति माताजी यांचे घटनास्थळीच निधन झाले. तर गंभीर जखमी झालेल्या पूज्य आर्यिका श्री उपशममति माताजी यांना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले. उपचारादरम्यान उपशममति माताजींची प्राणज्योत मालवली उपशममति माताजी यांच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली होती. त्यांच्यावर शस्त्रक्रियाही करण्यात आली; मात्र त्या कोमात गेल्या होत्या आणि मेंदूने प्रतिसाद देणे थांबवले होते. अखेर संध्याकाळी साडेचार वाजता उपचारादरम्यान त्यांचेही समाधीमरण झाले. विद्यासागर महाराजांच्या परंपरेतील साध्वी समाधी प्राप्त झालेल्या दोन्ही आर्यिका माताजी या संत शिरोमणी आचार्य श्री विद्यासागर जी महाराज यांच्या परंपरेतील मुनि श्री अचल सागर जी महाराज यांच्या पूर्वाश्रमातील सख्ख्या बहिणी होत्या. त्यांच्या अचानक जाण्याने जैन समाजासह सागर शहरात शोककळा पसरली आहे.

### चालक फरार; जबलपूरजवळ अटक

अपघात घडल्यानंतर कार चालक घटनास्थळावरून फरार झाला होता. पोलिसांनी तत्काळ तपासाची चक्रे फिरवत आरोपी चालकाला जबलपूरजवळ अटक केली. अपघातातील ऑल्टो कार जप्त करण्यात आली असून पुढील तपास सुरू आहे.

### भावपूर्ण श्रद्धांजली

अचानक समाधी प्राप्त झालेल्या पूज्य आर्यिका श्री श्रुतमति माताजी आणि पूज्य आर्यिका श्री उपशममति माताजी यांच्या पावन चरणी भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात येत असून संपूर्ण जैन समाज त्यांच्या स्मृतींना विनम्र अभिवादन करत आहे.


जन सम्राट टाईम्स | अँकर न्यूज | ज

# जि. प. शाळांची पटसंख्या वाढविण्यासाठी विशेष प्रयत्नांची गरज

## 'निपुण भारत' अभियानाच्या आढावा बैठकीत शिक्षकांना गुणवत्तापूर्ण शिक्षणावर भर देण्याचे आवाहन

जन सम्राट टाईम्स

**जळगाव ।| प्रतिनिधी :** ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांपर्यंत शिक्षणाची गंगा पोहोचविण्यात जिल्हा परिषद शाळांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असून, या शाळांची गुणवत्ता आणि पटसंख्या वाढविण्यासाठी शिक्षकांनी विशेष प्रयत्न करावेत, असे आवाहन जिल्हाधिकारी रोहन घुगे यांनी केले. निपुण भारत अभियानांतर्गत राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांच्या आढावा बैठकीत ते बोलत होते.जिल्हा परिषदेच्या शाहू महाराज सभागृहात आयोजित करण्यात आलेल्या या बैठकीला शिक्षण विभागातील अधिकारी, केंद्रप्रमुख आणि मुख्याध्यापक मोठ्या संख्येने उपस्थित होते. बैठकीत जिल्ह्यात निपुण भारत



अभियानाची अंमलबजावणी, विद्यार्थ्यांची शैक्षणिक गुणवत्ता आणि जिल्हा परिषद शाळांपुढील वाढती स्पर्धा यावर सविस्तर चर्चा करण्यात आली. यावेळी मार्गदर्शन करताना जिल्हाधिकारी रोहन घुगे म्हणाले की, ग्रामीण विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची पहिली पायरी ही जिल्हा परिषद शाळांमधूनच सुरू होते. त्यामुळे या शाळा म्हणजे समाजातील नवी पिढी घडविणारी खरी मंदिरे आहेत. ग्रामीण भागातील पालकांचा विश्वास अधिक दृढ करण्यासाठी शाळांनी गुणवत्तापूर्ण शिक्षणासोबत विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासावर भर देणे आवश्यक आहे. ते पुढे म्हणाले की, येणाऱ्या काळात जिल्हा परिषद शाळांमध्ये अधिकाधिक विद्यार्थ्यांनी प्रवेश घ्यावा यासाठी शिक्षकांनी गावपातळीवर जनजागृती करावी. विद्यार्थ्यांच्या गुणवत्तावाढीसोबतच शिस्त, आत्मविश्वास आणि कौशल्य विकास यावरही भर दिला गेला पाहिजे. ज्या शाळा पटसंख्या वाढविण्यात यशस्वी ठरतील, त्यांना जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून विशेष निधी उपलब्ध करून दिला जाईल. तसेच उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या शाळांचा आणि शिक्षकांचा जिल्हास्तरावर गौरव करण्यात येईल, अशी घोषणाही त्यांनी केली. यावेळी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी करिश्मा नायर यांनीही शिक्षकांना मार्गदर्शन केले. त्यांनी सांगितले की, जिल्ह्यातील एकही शाळा निपुण होण्यापासून वंचित राहता कामा नये. विद्यार्थ्यांची निपुण क्षमता वाढविण्यासाठी शिक्षकांनी अधिक सक्रियपणे काम करण्याची गरज आहे. केवळ पुस्तकी ज्ञानापुरते शिक्षण मर्यादित न ठेवता विद्यार्थ्यांचे अवांतर ज्ञान, बौद्धिक विकास आणि सर्जनशीलता वाढविणाऱ्या शिक्षणपद्धतीचा अवलंब करावा, अशा सूचनाही त्यांनी दिल्या.

### शैक्षणिक प्रगतीचे परीक्षण करण्यात यावे

बैठकीत शिक्षण विभागासाठी स्वतंत्र धोरण आणि कृती आराखडा तयार करण्यावर विशेष भर देण्यात आला. प्रत्येक महिन्याला जिल्हास्तर आणि तालुकास्तरावर निपुण भारत अभियानाचा नियमित आढावा घेण्यात यावा, तसेच शिक्षक आणि मुख्याध्यापकांच्या नियमित बैठका आयोजित करून शैक्षणिक प्रगतीचे परीक्षण करण्यात यावे, अशा सूचना संबंधित अधिकाऱ्यांना देण्यात आल्या. या बैठकीला अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी रणधीर सोमवंशी, उपमुख्य कार्यकारी अधिकारी मनोज चौधर, शिक्षणाधिकारी निलेश पाटील, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य डॉ. अनिल झोपे, माध्यमिक शिक्षण अधिकारी कल्पना चव्हाण यांच्यासह जिल्ह्यातील गटशिक्षणाधिकारी, केंद्रप्रमुख आणि मुख्याध्यापक उपस्थित होते.

Selected

## आपत्ती व्यवस्थापनात कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करा : मुख्यमंत्री

**मुंबई :** राज्यातील यंदाची मान्सून स्थिती थोडी प्रतिकूल असणार आहे. अल निनो चे संकट संपूर्ण देशावर आहे. त्यासाठी काय खबरदारी घेण्याची गरज आहे ते राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले आहे. मुख्यमंत्री फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली मान्सून पूर्व तयारी व आपत्ती व्यवस्थापनाबाबत आढावा बैठक सह्याद्री अतिथीगृह येथे झाली. यावेळी आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन, मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद पाटील, मुख्य सचिव राजेश अग्रवाल, पोलीस महासंचालक सदानंद दाते, मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव लोकेश चंद्रा, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणचे महानगर आयुक्त डॉ. संजय मुखर्जी, मुंबई महापालिकेच्या आयुक्त अश्विनी भिडे, मुंबईचे पोलीस आयुक्त देवेन भारती, विविध विभागांचे प्रमुख उपस्थित होते. मदत व पुनर्वसन राज्यमंत्री ॲड आशिष जयस्वाल व सर्व महसूली विभागांचे विभागीय आयुक्त दूरदृश्य प्रणाली द्वारे सहभागी झाले होते.

# धुळे महिला रुग्णालयाच्या प्रवेशद्वाराला मोठे भगदाड!

### ॲड. पंकज गोरे यांची स्पॉट पाहणी; त्रिसदस्यीय चौकशी समिती नेमण्याची मागणी

जन सम्राट टाईम्स

**धुळे | प्रतिनिधी:** धुळे शहरातील जिल्हा रुग्णालय परिसरात नव्याने उभारण्यात आलेल्या महिला व बालकल्याण रुग्णालयाच्या प्रवेशद्वार भिंतीला तब्बल दहा फुटांचे मोठे भगदाड पडल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. विशेष म्हणजे, रुग्णालयाचे उद्घाटनही अद्याप झाले नसताना भिंतीला पडलेल्या या तड्यामुळे बांधकामाच्या दर्जावर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. या प्रकरणाची शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे युवासेना महाराष्ट्र सहसचिव ॲडव्होकेट पंकज गोरे यांनी प्रत्यक्ष पाहणी करत चौकशीची मागणी केली आहे. कोट्यवधींच्या कामावर प्रश्नचिन्ह



महिला व लहान बालकांना अत्याधुनिक आरोग्य सुविधा उपलब्ध व्हाव्यात या उद्देशाने शासनामार्फत कोट्यवधी रुपयांचा निधी खर्च करून या रुग्णालयाचे नूतनीकरण करण्यात आले आहे. काही दिवसांपूर्वीच प्रवेशद्वार व संरक्षक भिंतीचे काम पूर्ण झाले होते. मात्र उद्घाटनापूर्वीच प्रवेशद्वाराला मोठे भगदाड पडल्याने काम निकृष्ट दर्जाचे झाल्याचा आरोप होत आहे. या घटनेवर प्रतिक्रिया देताना ॲड. पंकज गोरे यांनी प्रशासनावर उपरोधिक टीका केली. "प्रवेशद्वाराची जुनी भिंत मजबूत होती की नवीन भिंत?" असा सवाल उपस्थित करत, "अधिकाऱ्यांनी रात्री येथे बॉक्सिंग स्पर्धा घेतली होती काय?" असा टोला त्यांनी लगावला. महिला व बाल रुग्णालयाचे तातडीने लोकार्पण करावे, अशी मागणी काही दिवसांपूर्वीच ॲड. गोरे यांनी केली होती.

तसेच उद्घाटन लांबल्यास आंदोलन छेडण्याचा इशाराही त्यांनी दिला होता. प्रशासनाकडून मे महिन्यात लोकार्पणाचे आश्वासन देण्यात आले होते. मात्र त्याआधीच भिंतीला पडलेल्या भगदाडामुळे प्रशासनाच्या कामकाजावर प्रश्न उपस्थित होत आहेत. "आयसीयूही गळत होते" गेल्या पावसाळ्यात नव्याने तयार करण्यात आलेले आयसीयू विभागही पावसात गळत असल्याचे वृत्त समोर आले होते. त्या प्रकरणावर काय कारवाई करण्यात आली, असा सवालही ॲड. गोरे यांनी उपस्थित केला आहे. रुग्णालयाच्या बांधकामासह साहित्य खरेदी प्रक्रियेतही मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार झाल्याचा आरोप करत ॲड. गोरे यांनी आरोग्य आयुक्तालय, मुंबई यांच्या माध्यमातून त्रिसदस्यीय चौकशी समिती नेमण्याची मागणी केली आहे. चौकशीत दोषी आढळणाऱ्यांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणीही त्यांनी केली.

#### दुर्घटनेचा इशारा

दुप्रवेशद्वाराची भिंत पावसाळ्यात कोसळून मोठी दुर्घटना घडल्यास त्यास रुग्णालय प्रशासन जबाबदार राहील, असा इशारा देत ॲड. पंकज गोरे यांनी जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. रवी सोनवणे यांना प्रत्यक्ष स्पॉट पंचनामा करून हा प्रकार निदर्शनास आणून दिला. यावेळी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे विभागप्रमुख सागर साळवे, सौरभ जवराळ, ज्ञानेश्वर देवरे, विक्की गर्ग, पवन खांडरे, पवन सरग, विशाल ढेकळे आणि दर्शन खंबायत उपस्थित होते.

जन सम्राट टाईम्स विशेष बातमी

## राज्यातही मतदारयाद्यांमध्ये घोळ करण्याचा प्रयत्न?

### फेरतपासणी मोहिमेवर गंभीर आरोप

जन सम्राट टाईम्स



**मुंबई | प्रतिनिधी:** राज्यात सुरू असलेल्या मतदार यादी फेरतपासणी (एसआयआर) मोहिमेवर महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस समितीने गंभीर आरोप करत निवडणूक प्रक्रियेवर प्रभाव टाकण्याचा प्रयत्न सुरू असल्याचा दावा केला आहे. भाजपने निवडणूक आयोगाच्या मदतीने मतदानचोरी करून महाराष्ट्रात सत्ता मिळवली असून बिहार आणि बंगालमध्येही मतदारांची नावे वगळून विजय मिळवला, असा आरोप काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केला. मुंबई येथे महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस समितीची उच्चस्तरीय बैठक पार पडली. या बैठकीत मतदार यादीतील कथित गैरप्रकार, मतदानचोरी आणि एसआयआर मोहिमेबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. वरिष्ठ नेत्यांची बैठक बैठकीला माजी मुख्यमंत्री सुशीलकुमार शिंदे, काँग्रेस विधिमंडळ पक्षाचे नेते विजय वडेट्टीवार, काँग्रेस कार्यकारी समिती सदस्य बाळासाहेब थोरात आणि नसीम खान, अखिल भारतीय काँग्रेस कमिटीचे सरचिटणीस गुरुदीप सप्पल, विधान परिषदेतील काँग्रेस पक्षाचे गटनेते सतेज ऊर्फ बंटी पाटील, माजी मंत्री डॉ. नितीन राऊत, ॲड. यशोमती ठाकूर यांच्यासह खासदार, आमदार आणि बूथस्तरीय कार्यकर्ते उपस्थित होते. केरळ विजयाबद्दल अभिनंदन ठराव बैठकीच्या सुरुवातीला केरळ विधानसभा निवडणुकीतील काँग्रेसच्या विजयाबद्दल अखिल भारतीय काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांचे अभिनंदन करणारा ठराव मंजूर करण्यात आला. तसेच केरळचे प्रभारी रमेश चेन्नीथला यांनी गृहमंत्रीपदाची शपथ घेतल्याबद्दल अभिनंदन करण्यात आले. यावेळी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीच्या वतीने एसआयआर मोहिमेसंदर्भातील जनजागृती अभियानाच्या लोगोचेही अनावरण करण्यात आले. मतदार हक्कांसाठी काँग्रेस मैदानात पत्रकार परिषदेत बोलताना हर्षवर्धन सपकाळ यांनी प्रत्येक मतदाराचे संरक्षण करण्यासाठी काँग्रेस पक्ष सज्ज असल्याचे सांगितले. राज्यभर जनजागृती मोहीम राबवून मतदारांचे अधिकार अबाधित ठेवण्यासाठी काँग्रेस आक्रमकपणे मैदानात उतरणार असल्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला. विशेष समिती स्थापन एसआयआर मोहिमेच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस समितीने विशेष समिती स्थापन करण्याचा निर्णय घेतला आहे. विधान परिषदेतील काँग्रेस पक्षाचे गटनेते सतेज ऊर्फ बंटी पाटील यांची समिती प्रमुखपदी नियुक्ती करण्यात आली असून अभिजीत सपकाळ हे समन्वयक म्हणून काम पाहणार आहेत. ही समिती राज्यभरातील जिल्हा आणि तालुका स्तरावरील यंत्रणेशी समन्वय साधून मतदार यादी पडताळणी मोहिमेला गती देणार असल्याचे सपकाळ यांनी स्पष्ट केले. विधान परिषद निवडणुकांवरही चर्चा आगामी विधान परिषद निवडणुकांबाबत बोलताना राज्यातील अनेक ठिकाणी कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण असल्याचे सपकाळ यांनी सांगितले. मित्रपक्षांसोबत सकारात्मक चर्चा सुरू असून लवकरच अंतिम निर्णय जाहीर केला जाईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

जन सम्राट टाईम्स ब्रेक न्यूज

## 'पार्किन्सनवर बोलू काही' चर्चासत्राला ज्येष्ठांचा प्रतिसाद

### शंभरहून अधिक ज्येष्ठ नागरिकांचा सहभाग



जन सम्राट टाईम्स

**मुंबई | प्रतिनिधी : :** यशवंतराव चव्हाण सेंटर आणि पार्किन्सन'स डिसीज अँड मूव्हमेंट डिसऑर्डर सोसायटी यांच्या संयुक्त विद्यमाने गुरुवार, दि. २१ मे २०२६ रोजी पु. ल. देशपांडे अकॅडमी येथे "पार्किन्सनवर बोलू काही" या विषयावर चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाला ज्येष्ठ नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. पार्किन्सन आजाराविषयी सविस्तर मार्गदर्शन या चर्चासत्रात पीडीएमडीएसच्या डॉ. अंजुम तडवी यांनी पार्किन्सन आजाराची लक्षणे, त्यावरील काळजी, उपचारपद्धती आणि व्यवस्थापन याविषयी अत्यंत सोप्या भाषेत मार्गदर्शन केले. त्यांच्या माहितीपूर्ण सादरीकरणामुळे उपस्थितांमध्ये आजाराबाबत जागरूकता निर्माण झाली. मुंबई प्रादेशिक विभागातील जवळपास शंभर ज्येष्ठ नागरिकांनी चर्चासत्रात सक्रिय सहभाग नोंदवला. कार्यक्रमादरम्यान उपस्थितांनी विविध प्रश्न विचारून तज्ज्ञांकडून मार्गदर्शन घेतले. कार्यक्रमासोबतच काष्ठशिल्पकार शंकरबाबा पापळकर यांच्या काष्ठशिल्पांचे प्रदर्शनही आयोजित करण्यात आले होते. या प्रदर्शनाला उपस्थित ज्येष्ठ नागरिकांनी मोठी पसंती दिली. कार्यक्रमास फेस्कोम कोकण विभागाचे माजी अध्यक्ष शरद डिचोलकर, आरोग्य, दिव्यांग आणि ज्येष्ठ नागरिक विभागाच्या प्रमुख दिपिका शेरखाने व मनिषा खिल्लारे उपस्थित होत्या. पार्किन्सन आजाराविषयी सविस्तर मार्गदर्शन या चर्चासत्रात पीडीएमडीएसच्या डॉ. अंजुम तडवी यांनी पार्किन्सन आजाराची लक्षणे, त्यावरील काळजी, उपचारपद्धती आणि व्यवस्थापन याविषयी अत्यंत सोप्या भाषेत मार्गदर्शन केले. तसेच पु. ल. देशपांडे कला अकादमी च्या संचालक मीनल जोगळेकर यांची प्रमुख उपस्थिती लाभली. कला अकादमीच्या प्रमुख वर्षा कराळे यांचे विशेष सहकार्य लाभले.

#### आरोग्य जनजागृतीसाठी उपयुक्त उपक्रम


उपयुक्त माहिती, तज्ज्ञांचे मार्गदर्शन आणि सामाजिक सहभाग यामुळे हे चर्चासत्र यशस्वी ठरले. या उपक्रमातून ज्येष्ठ नागरिकांमध्ये आरोग्यविषयक जागरूकता वाढविण्यात महत्त्वपूर्ण योगदान मिळाल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

# कल्याण-डोंबिवलीत अनधिकृत बांधकामांवर पालिकेची धडक कारवाई

### अ प्रभागात 100 हून अधिक खोल्या आणि 70 जोते जमीनदोस्त

जन सम्राट टाईम्स

**कल्याण। प्रतिनिधी** कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या अ प्रभाग क्षेत्रातील अनधिकृत बांधकामांविरोधात महापालिका प्रशासनाने मोठी धडक कारवाई करत 100 हून अधिक अनधिकृत खोल्या तसेच सुमारे 70 जोते जमीनदोस्त केले. या कारवाईमुळे परिसरातील अनधिकृत बांधकाम व्यावसायिकांमध्ये मोठी खळबळ उडाली आहे. अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत व्यापक मोहीम महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त गोरसे तसेच सहाय्यक आयुक्त जयवंत चौधरी यांच्या उपस्थितीत ही व्यापक कारवाई करण्यात आली. कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी परिसरात मोठा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. या मोहिमेत पालिकेचे अधिकारी, कर्मचारी, अतिक्रमण विभागाचे पथक तसेच मोठ्या प्रमाणावर यंत्रसामग्री सहभागी झाली होती. वारंवार नोटिसांनंतर कारवाई पालिका प्रशासनाने दिलेल्या माहितीनुसार, संबंधित बांधकामे कोणतीही अधिकृत परवानगी



न घेता उभारण्यात आली होती. यापूर्वी संबंधितांना वारंवार नोटिसा देण्यात आल्या होत्या. मात्र बांधकामे हटविण्यात न आल्याने अखेर कठोर कारवाईचा बडगा उगारण्यात आला. जेसीबीच्या सहाय्याने बांधकामे पाडली या कारवाईदरम्यान जेसीबी आणि इतर यंत्रांच्या सहाय्याने अनधिकृत बांधकामे पाडण्यात आली. कारवाई सुरू असताना परिसरात काही काळ तणावपूर्ण वातावरण निर्माण झाले होते. मात्र पोलिसांच्या कडक बंदोबस्तामुळे परिस्थिती नियंत्रणात राहिली. पालिका प्रशासनाचा इशारा महापालिका प्रशासनाने नागरिकांना अनधिकृत बांधकामे टाळण्याचे आवाहन करत नियमबाह्य बांधकामांविरोधात पुढेही अशीच कठोर कारवाई सुरू राहणार असल्याचा इशारा दिला आहे.

## पर्यावरण चळवळीला युवा नेतृत्वाची नवी ताकद!

जन सम्राट टाईम्स

**जळगाव | प्रतिनिधी :** पर्यावरण संवर्धन आणि सामाजिक बांधिलकी जपणाऱ्या कार्यकर्त्यांना संघटनेत महत्त्वाची जबाबदारी देत पर्यावरण संवर्धन व विकास समितीने भुसावळमध्ये युवा नेतृत्वाला प्रोत्साहन दिले आहे. समितीचे अध्यक्ष तथा पत्रकार डी. के. आरिकर यांच्या आदेशाने प्रांजल नारायण पाटील यांची पर्यावरण संवर्धन व विकास समितीच्या भुसावळ शहर कोषाध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे. ही नियुक्ती उत्तर महाराष्ट्र अध्यक्ष सुखदेव लक्ष्मण भालेराव (पत्रकार), उत्तर महाराष्ट्र सचिव, भूगोल अभ्यासक व संशोधक प्रा. योगेश दिनकर गोसावी तसेच जळगाव जिल्हाध्यक्ष देवेंद्र सुरेखा मधुकर वराडे (अप्पा) यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. पर्यावरण संवर्धनासाठी सातत्याने कार्य प्रांजल पाटील हे वृक्षारोपण, जैवविविधता संवर्धन, पाणी बचत, पर्यावरण जनजागृती आणि सामाजिक



उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घेणारे युवा कार्यकर्ते म्हणून ओळखले जातात. विविध सामाजिक प्रश्नांवरही त्यांनी सातत्याने आवाज उठवत जनजागृतीचे कार्य केले आहे. भुसावळमध्ये पर्यावरण उपक्रमांना मिळणार गती त्यांच्या निवडीमुळे भुसावळ शहर व तालुक्यात पर्यावरण संरक्षण, वृक्षलागवड, जलसंवर्धन आणि स्वच्छता अभियानासारख्या उपक्रमांना अधिक चालना मिळेल, असा विश्वास समितीच्या पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला आहे. सामाजिक स्तरातून अभिनंदनाचा वर्षाव प्रांजल पाटील यांच्या निवडीचे विविध सामाजिक संस्था, पर्यावरणप्रेमी आणि नागरिकांकडून स्वागत होत असून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव केला जात आहे. भविष्यात पर्यावरण संवर्धनासाठी व्यापक जनआंदोलन उभे करण्याचा मानस त्यांनी व्यक्त केला आहे.

## नशिराबाद येथे 'अप्पर तहसील कार्यालय' मंजूर करा उपनगराध्यक्ष महाजन यांची जिल्हाधिकाऱ्यांकडे मागणी!

### नशिराबादसह परिसरातील ३० हून अधिक गावांना होणार थेट फायदा

जन सम्राट टाईम्स

**नशिराबाद | प्रतिनिधी :** ऐतिहासिक वारसा लाभलेल्या नशिराबाद शहराला पुन्हा गतवैभव प्राप्त करून देण्यासाठी तसेच जळगाव तालुक्यातील वाढत्या महसुली कामांचा ताण कमी करण्यासाठी नशिराबाद येथे 'अप्पर तहसील कार्यालय' मंजूर करण्यात यावे, अशी मागणी नशिराबाद नगरपरिषदेचे उपनगराध्यक्ष पंकज शामकांत महाजन यांनी जळगाव जिल्हाधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे केली आहे.

या मागणीमुळे नशिराबादसह परिसरातील ३० हून अधिक गावांतील नागरिकांना महसुली कामांसाठी मोठा दिलासा मिळणार असल्याचे सांगण्यात आले. ऐतिहासिक नशिराबादचे महत्त्व अधोरेखित जिल्हाधिकाऱ्यांना सादर करण्यात आलेल्या निवेदनात नशिराबादच्या ऐतिहासिक महत्त्वाचा उल्लेख करण्यात आला आहे. ब्रिटिश काळात नशिराबाद हे 'परगणा' केंद्र होते. त्या काळात येथे तहसील कार्यालय, न्यायालय तसेच फाशीची शिक्षा देण्याची व्यवस्थाही अस्तित्वात होती.

व्यापार आणि महसुली कामांचे हे महत्त्वाचे केंद्र म्हणून नशिराबादची ओळख होती. स्वातंत्र्यानंतर जळगाव तालुका आणि जिल्ह्याचा विस्तार मोठ्या प्रमाणावर झाल्याने महसुली कामांचा ताण वाढला असून प्रशासकीय कामकाजात विलंब होत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. ३० पेक्षा अधिक गावांना होणार सुविधा शासनाने २ एप्रिल २०२६ रोजीच्या शासन निर्णयानुसार जळगाव जिल्ह्यातील चाळीसगाव, जामनेर आणि जळगाव तालुक्यात अप्पर तहसील कार्यालय स्थापन करण्यास मंजुरी दिली आहे. हे कार्यालय नशिराबाद येथे मंजूर झाल्यास उमाळा, देव्हारी, चिंचोली, धानवड, भागपूर, कुसुंबे खुर्द, कंडारी, रायपूर, मन्यारखेडा, बेळी, निमगाव, तिघ्रे, खिर्डी, कानसवाडे, भोलाणे, आसोदा, तरसोद, ममुराबाद, इदगाव, धामणगाव, खापरखेडा यांसह ३० हून अधिक गावांतील नागरिकांना महसुली कामांसाठी जळगाव शहरात जावे लागणार नाही. या कार्यालयासाठी आवश्यक जागा नशिराबाद नगरपरिषदेतर्फे मोफत उपलब्ध करून देण्याची तयारी असल्याची ग्वाही उपनगराध्यक्ष पंकज महाजन यांनी दिली आहे. त्यामुळे प्रशासनाने या मागणीवर सकारात्मक आणि तात्काळ निर्णय घ्यावा, अशी मागणी करण्यात आली आहे. या निवेदनावर राहुल सुरेश चौधरी, रविंद्र संतोष चौधरी, मुरलीधर गोविंदा पवार, दिलीप वासुदेव कोळी, वैभव संजय गोसावी, भूषण भानुदास कोल्हे आणि संदीप विष्णू पाटील यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

#### नगरपालिकेकडून जागा देण्याची तयारी

नशिराबाद येथे नगरपरिषद स्थापन झाल्यानंतर शहराच्या विकासाला गती मिळाली आहे. अशा परिस्थितीत अप्पर तहसील कार्यालय मंजूर झाल्यास शहराच्या विकासात आणखी भर पडेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला आहे.

जन सम्राट टाईम्स अँकर न्यूज

# रावेर तालुक्यात अवैध गौण खनिज वाहतुकीचा सुळसुळाट

### दिवसा माती, रात्री वाळूची तस्करी; ग्रामस्थ संतप्त, कठोर कारवाईची मागणी

जन सम्राट टाईम्स

**रावेर | प्रतिनिधी :** रावेर तालुक्यात अवैध गौण खनिज वाहतुकीने पुन्हा डोके वर काढले असून, दिवसा मातीची तर रात्री मोठ्या प्रमाणावर वाळूची अवैध वाहतूक सुरू असल्याचे गंभीर चित्र समोर येत आहे. तालुक्यातील विविध भागांमध्ये विना परवाना उत्खनन आणि वाहतूक सुरू असल्याने महसूल प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे. वाढत्या अवैध वाहतुकीमुळे ग्रामस्थांमध्ये तीव्र नाराजीचे वातावरण निर्माण झाले असून तातडीने कठोर कारवाईची मागणी जोर धरू लागली आहे. रावेर शहरासह खिरवड, अटवाडे, के-हाळा, धामोडी, ऐनपूर आणि कांडवेल परिसरात मोठ्या प्रमाणावर अवैध गौण खनिज वाहतूक सुरू असल्याची चर्चा नागरिकांमध्ये सुरू आहे. काही भागांत दिवसाढवळ्या मातीचे उत्खनन करून ट्रॅक्टर आणि डंपरच्या माध्यमातून वाहतूक केली जात असल्याचे सांगितले जात आहे. तर रात्रीच्या वेळी अवैध वाळू वाहतूक करणारी वाहने मोठ्या प्रमाणावर रस्त्यांवरून धावत असल्याचा आरोप ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे. स्थानिक नागरिकांच्या मते, या अवैध वाहतुकीमुळे ग्रामीण भागातील



रस्त्यांची मोठ्या प्रमाणावर दुरवस्था होत आहे. जड वाहनांच्या सततच्या वर्दळीमुळे रस्त्यांवर मोठे खड्डे पडत असून अपघाताचा धोका वाढला आहे. विशेषतः रात्रीच्या वेळी वेगाने धावणाऱ्या वाहनांमुळे नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला आहे. शाळकरी विद्यार्थी, दुचाकीस्वार आणि ग्रामस्थांना या परिस्थितीचा मोठा त्रास सहन करावा लागत असल्याची भावना व्यक्त केली जात आहे. महसूल विभागाकडून वेळोवेळी कारवाई होत असल्याचे सांगितले जात असले तरी प्रत्यक्षात अवैध वाहतूक थांबत नसल्यामुळे प्रशासनाच्या भूमिकेवर प्रश्न उपस्थित होत आहेत. काही दिवस कारवाई झाल्यानंतर पुन्हा त्याच प्रकारे अवैध वाहतूक सुरू होत असल्याने संबंधित यंत्रणांकडून प्रभावी आणि कायमस्वरूपी उपाययोजना होत नसल्याचे दिसून येत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. दरम्यान, तहसीलदार दिपा जेधे यांनी या प्रकरणाची गंभीर दखल घेऊन अवैध उत्खनन आणि वाहतूक करणाऱ्यांविरोधात कठोर कारवाई करावी, अशी मागणी ग्रामस्थांकडून होत आहे. तसेच जिल्हाधिकारी रोहन घुगे यांनी स्वतः या प्रकरणात हस्तक्षेप करून विशेष पथकाच्या माध्यमातून व्यापक मोहीम राबवावी, अशी मागणीही जोर धरू लागली आहे.

#### सार्वजनिक सुरक्षेलाही धोका निर्माण

अवैध गौण खनिज वाहतुकीमुळे शासनाचा महसूल बुडत असतानाच पर्यावरण आणि सार्वजनिक सुरक्षेलाही धोका निर्माण होत असल्याने प्रशासनाने याप्रकरणी तातडीने कठोर भूमिका घेण्याची गरज व्यक्त केली जात आहे.रात्रीच्या वेळी अवैध वाळू वाहतूक करणारी वाहने मोठ्या प्रमाणावर रस्त्यांवरून धावत असल्याचा आरोप ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे. स्थानिक नागरिकांच्या मते, या अवैध वाहतुकीमुळे ग्रामीण भागातील रस्त्यांची मोठ्या प्रमाणावर दुरवस्था होत आहे.

## काँग्रेसच्या पुणे शहराध्यक्षपदी नियुक्तीनिमित्त जगताप यांचा सत्कार



जन सम्राट टाईम्स

**पुणे | प्रतिनिधी :** पुण्यनगरीचे माजी महापौर तथा नगरसेवक प्रशांत दादा जगताप यांची काँग्रेस पक्षाच्या पुणे शहराध्यक्षपदी नियुक्ती झाल्याबद्दल भारतीय राष्ट्रीय मजदूर काँग्रेस (महासंघ) इंटक पुणे जिल्ह्याच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला. वानवडी, पुणे येथील त्यांच्या कार्यालयात आयोजित कार्यक्रमात इंटकचे पुणे जिल्हाध्यक्ष ॲड. धनंजय बुद्धिवंत यांच्या हस्ते शाल व पुष्पगुच्छ देऊन प्रशांत दादा जगताप यांचा गौरव करण्यात आला. यावेळी काँग्रेस इंटकच्या पुणे जिल्हा महिला अध्यक्षा सुवर्णा माने, पुणे जिल्हा महिला कार्याध्यक्ष अलिशा बुद्धिवंत, काँग्रेस इंटकचे पुणे शहराध्यक्ष इमरान शेख यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. कार्यक्रमात प्रशांत दादा जगताप यांच्या पुढील राजकीय व सामाजिक वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या.